।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ७ जून २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक २३ वा

## अवकाळी पावसामुळे डाळिंब, पेरू बागांचे नुकसान; त्वरित पंचनामे करून मदत द्यावी - आ.डॉ.बाबासाहेब देशमुख



सांगोला : सांगोला तालुक्यातील जुजारपूर, सोमेवाडी, गौडवाडी, बुद्धेहाळ, जुनोनी, करांडेवाडी, तिप्पेहळ्ळी, कोळा, ह.मंगेवाडी, गुणापवाडी, हतीद, सावे, सोनंद, चोपडी, नवी लोटेवाडी, किडेबिसरी तसेच सांगोला शहरात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे घरांची पडझड होऊन आर्थिक नुकसान तसेच डाळिंब, पेरू व इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बागांचे तातडीने पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण व वादळी वारे सुरू असल्याने फळबागांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः डाळिंब आणि पेरू उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी फळगळ, फळांना तडे जाणे, डाग पडणे तसेच उत्पादनाच्या गुणवत्तेवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. सांगोला तालुका हा डाळिंब आणि पेरू उत्पादनासाठी राज्यात ओळखला जातो.

हजारो शेतकरी या फळबागांवर अवलंबून असून मोठ्या खर्चातून त्यांनी बागा जोपासल्या आहेत. मात्र ऐन उत्पादनाच्या काळात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी प्रशासनाने तात्काळ नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत तसेच शासनाने विशेष मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

कृषी व महसूल विभागाने संयुक्त सर्वेक्षण करून नुकसानाचा अहवाल तातडीने शासनाकडे पाठवावा, असेही त्यांनी नमूद केले. सांगोला तालुक्यातील अर्थव्यवस्थेमध्ये डाळिंब आणि पेरू उत्पादनाचा मोठा वाटा असून हजारो शेतकरी या फळबागांवर अवलंबून आहेत. त्यामुळे अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाने त्वरित मदतीचा हात देऊन दिलासा द्यावा, अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

## माजी नगरसेवक सिद्धेश्वर जाधव यांच्याकडून वाढदिवसानिमित्त सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट



सांगोला : सांगोला नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक सिद्धेश्वर (नाथा) जाधव यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला नगरपरिषदेस विविध प्रकारची झाडे भेट म्हणून दिली होती. ती झाडे सांगोला नगरपरिषदेमार्फत काल शहरामध्ये नगरपरिषदेसमोरील दुभाजकामध्ये लावण्यात आली.

यावेळी सांगोला नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने, इंजि.उत्कर्ष पाटील, माणगंगा परिवाराकडून आज सेवानिवृत्त अधिकारी व शिक्षकांचा भव्य गौरव सोहळा नगरपरिषदेकडून शहरामध्ये वृक्षारोपण संपन्न उद्योगपती यश जाधव, किरण मेटकरी, आरिफ मुलाणी, वैभव बडदे, यांच्यासह नगरपरिषदेकडील वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा माने यांनी आवाहन केल्याप्रमाणे माजी नगरसेवक सिद्धेश्वर जाधव यांनी नगरपरिषदेस झाडे भेट म्हणून दिल्याबद्दल नगराध्यक्ष आनंदा माने यांनी त्यांचे आभार मानले. तसेच शहरातील इतरही नागरिक, उद्योगपती यांनाही सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## शिवराज्याभिषेक दिनी सांगोल्यात वारकरी दिंड्यांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांना अनोखे अभिवादन



सांगोला : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त महाराजांच्या पुतळयास आकर्षक मंडप उभारून फुलांची भव्य सजावट करण्यात आली होती. सकाळपासूनच शिवप्रेमी, नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून अभिवादन केले.

अधिक महिन्याच्या निमित्ताने सांगोला शहरातून दररोज निघणाऱ्या कोष्टी गल्ली दिंडी, ब्राह्मण गल्ली दिंडी, महादेव गल्ली दिंडी तसेच वज्राबाद पेठेतील दिंडीतील वारकरी राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र आले. यावेळी वारकऱ्यांनी पोवाडे, घोषणाबाजी आणि भक्तीमय वातावरणातून शिवरायांच्या कार्याचा गौरव केला. दिंडीतील वारकरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासमोर थांबून टाळ-मृदुंगाच्या गजरात महाराजांना अभिवादन करत होते. राज्याभिषेक सोहळ्याचे पोवाडे सादर करण्यात आल्याने परिसर शिवमय झाला होता. वारकरी परंपरा आणि शिवचरित्राचा अनोखा संगम नागरिकांना अनुभवता आला.

शिवप्रेमी तरुण मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांगोला यांच्या वतीने राज्याभिषेक दिनानिमित्त सर्व दिंडीतील वारकऱ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. मंडळाच्या या उपक्रमाचे वारकरी व नागरिकांनी स्वागत केले. तसेच उपस्थित शिवभक्तांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास शिवप्रेमींकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाराजांना पुष्पहार अर्पण करून राज्याभिषेक दिनाचा उत्सव साजरा करण्यात आला. शिवरायांच्या पराक्रम व आदर्शांचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांना मानवंदना दिली.

राज्याभिषेक दिनानिमित्त सांगोला शहरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, व्यापारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी स्मारकास भेट देऊन महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. दिवसभर शिवभक्तांची स्मारक परिसरात मोठी गर्दी पाहावयास मिळाली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त वारकरी संप्रदाय, शिवप्रेमी संघटना आणि नागरिक एकत्र येऊन व्यक्त केलेली कृतज्ञता व अभिवादन हा सांगोल्यातील एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी सोहळा ठरला. वारकरी परंपरेतून शिवरायांच्या स्मृतींना दिलेला हा मान नागरिकांच्या विशेष आकर्षणाचा विषय ठरला.

## सांगोला शहरातील आकाश जाधव याचा लेह-लडाख मध्ये अपघातात दुर्दैवी मृत्यू

### आनंदाच्या क्षणांसाठी सुरु झालेल्या प्रवासाचा शेवट दुःखद घटनेत झाल्याने सर्वत्र हळहळ



सांगोला : आयुष्यभर स्मरणात राहावी म्हणून आखलेली लेह-लडाखची स्वप्नवत ट्रीप सांगोला शहरातील ८ मित्रांसाठी काळजाला चटका लावणारी ठरली. या आठ मित्रांपैकी एक असलेल्या आकाश अण्णासो जाधव (वय ३०) यांचा लडाखमधील नुब्रा व्हॅली येथे बाईक अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने सांगोला शहरावर शोककळा पसरली आहे.

सांगोला शहरातील अमित जाधव, राजीव शिर्के, सुधीर पलसे, सुमित गायकवाड, आकाश जाधव, विशाल घुटुकडे, सतीश जावीर, विजय माने व मंगळवेढ्यातील एक मित्र असे एकूण ९ जिवलग मित्र २७ मे रोजी लेह-लडाख सहलीसाठी रवाना झाले होते. निसर्गसौंदर्याचा आनंद घेत विविध पर्यटनस्थळांना भेटी देत असताना त्यांच्या सहलीवर अचानक दुःखाची छाया पसरली. बुधवारी (दि.३ जून) दुपारच्या सुमारास नुब्रा व्हॅली परिसरात बाईक रायडिंग सुरू असताना रस्त्याच्या कॉर्नर वरती दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात आकाश जाधव गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र नियतीने घात केला आणि त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात अमित जाधव हेही जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.


एकत्र निघालेल्या आठ मित्रांपैकी एक मित्र कायमचा दुरावल्याची बातमी समजताच मित्रपरिवार, नातेवाईक आणि सांगोला शहरातील नागरिकांना मोठा धक्का बसला. आनंदाच्या क्षणांसाठी सुरू झालेल्या प्रवासाचा शेवट अशा दुःखद घटनेत झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

यावेळी माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जखमी व सोबत असलेल्या युवकांची फोनद्वारे चौकशी करून त्यांना धीर दिला. अपघातानंतर झांस्कर, लडाख केंद्रशासित प्रदेशचे सहाय्यक आयुक्त तथा जिल्हाधिकारी ओंका राजेंद्र गुंदगे तसेच राज्यपालांचे विशेष कार्य अधिकारी कर्नल प्रशांत जानकर यांनी आवश्यक ते सहकार्य करून जखमींना मदत तसेच पार्थिव मायभूमीत पाठविण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली. गुरुवारी दुपारी लेह येथून आकाश जाधव यांचे पार्थिव विमानाने पुण्याकड रवाना करण्यात आले. सायंकाळी उशिरा पुणे विमानतळावर पोहोचल्यानंतर रुग्णवाहिके द्वारे पार्थिव सांगोल्यात पोहोचल्यानंतर शुक्रवारी सकाळी सांगोल्यातील स्मशानभुमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अवघ्या तिशीत असलेल्या आकाश जाधव यांच्या अकाली निधनाने जाधव कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून सहलीच्या आठवणी घेऊन परतण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मित्रांना मात्र आपल्या जिवलग मित्राचा पार्थिव देह घेऊन परतावे लागत असल्याने ही घटना अधिकच हृदयद्रावक ठरली आहे.

# मुक्त विचार

## विचारधन



सत्ता येत-जात राहील, पक्ष बनतील आणि तुटतील, पण हा देश असायला हवा आणि या देशातील लोकशाही अमर राहिली पाहिजे.

-अटलबिहारी वाजपेयी

# मतपत्रिकेकडे पुनरागमन की ईव्हीएमवर विश्वास? लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा निर्णायक प्रश्न

भारताच्या निवडणूक प्रक्रियेत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि मतदार पडताळणी यंत्रणा (व्हीव्हीपॅट) यांचा वापर गेल्या दोन दशकांपासून मोठ्या प्रमाणावर होत आहे. निवडणूक आयोगाच्या मते ही प्रणाली जलद, अचूक आणि पारदर्शक आहे. मात्र प्रत्येक निवडणुकीनंतर ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित होताना दिसतात. अलीकडेच पंजाबमध्ये पुन्हा एकदा मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी काही राजकीय पक्ष आणि सामाजिक गटांकडून करण्यात आली. त्याच अनुषंगाने उत्तर प्रदेशातील २०२७ च्या विधानसभा निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात का, हा प्रश्न आता सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. कारण हा मुद्दा थेट लोकशाहीच्या विश्वासार्हतेशी आणि मतदारांच्या मनातील निवडणूक प्रक्रियेबद्दलच्या विश्वासाशी संबंधित आहे.

भारतासारख्या विशाल लोकशाही राष्ट्रात निवडणुका म्हणजे जगातील सर्वात मोठा लोकशाही उत्सव. लाखो कर्मचारी, हजारो उमेदवार आणि कोट्यवधी मतदार या प्रक्रियेत सहभागी होतात. अशा परिस्थितीत मतपत्रिकेऐवजी ईव्हीएमचा वापर सुरू करण्यामागे अनेक व्यावहारिक कारणे होती. मतमोजणीतील विलंब, मोठ्या प्रमाणावर होणारे अवैध मतदान, मतपत्रिका लुटणे, बनावट मतदान आणि मतमोजणीतील मानवी चुका या समस्यांवर उपाय म्हणून ईव्हीएमचा स्वीकार करण्यात आला. खरे तर ईव्हीएममुळे निवडणूक निकाल काही तासांत जाहीर होऊ लागले. खर्चात बचत झाली. मतपत्रिकांच्या छपाईवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला. मतदान केंद्रांवरील व्यवस्थापन सुलभ झाले. त्यामुळे निवडणूक आयोग ईव्हीएम प्रणालीचे सातत्याने समर्थन करत आला आहे.

परंतु दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही. अनेक राजकीय पक्ष, निवृत्त प्रशासकीय अधिकारी, तंत्रज्ञान क्षेत्रातील काही तज्ज्ञ आणि नागरिक संघटना ईव्हीएमबाबत शंका व्यक्त करत आहेत. त्यांचा मुख्य युक्तिवाद असा आहे की कोणतीही इलेक्ट्रॉनिक प्रणाली शंभर टक्के त्रुटीमुक्त असू शकत नाही. यंत्रामध्ये फेरफार झाला नाही याची खात्री जनतेला कशी मिळणार? निवडणुकीतील पराभवानंतर अनेक पक्षांनी ईव्हीएमवर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी वेगवेगळ्या काळात अशा शंका व्यक्त केल्या आहेत. याच ठिकाणी प्रश्न फक्त ईव्हीएमचा राहत नाही तर तो लोकशाहीतील विश्वासाचा बनतो. एखादी निवडणूक निष्पक्ष झाली असली तरी जनतेच्या मनात संशय निर्माण झाला तर लोकशाही कमकुवत होते. निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास हा निकालापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो.

मतपत्रिकेच्या समर्थनार्थ बोलणाऱ्यांचे म्हणणे आहे की कागदी मतपत्रिका हा सर्वसामान्य नागरिकाला सहज समजणारा आणि पडताळता येणारा पर्याय आहे. मतदाराने दिलेले मत प्रत्यक्ष कागदावर नोंदवले जाते. आवश्यक असल्यास पुन्हा मोजणी करता येते. त्यामुळे पारदर्शकता वाढते. जगातील अनेक विकसित देश आजही कागदी मतपत्रिकांचा वापर करतात, हेही या गटाचे प्रमुख म्हणणे आहे. मात्र मतपत्रिका प्रणालीही निर्दोष नव्हती. भारताने अनेक दशकांपर्यंत मतपत्रिकेवर निवडणुका घेतल्या आणि त्या काळात बूथ कॅप्चरिंग, मतपेट्या पळविणे, खोट्या मतांची भर घालणे आणि मतमोजणीतील वाद यासारख्या गंभीर समस्या वारंवार समोर आल्या. अनेक ठिकाणी निवडणूक निकालांसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असे. त्यामुळे फक्त मतपत्रिका आली म्हणजे सर्व प्रश्न सुटतील, असेही म्हणता येणार नाही.

उत्तर प्रदेशासारख्या विशाल राज्यात २०२७ मध्ये मतपत्रिकेवर निवडणूक घेणे हा केवळ तांत्रिक प्रश्न नाही तर तो आर्थिक, प्रशासकीय आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित आहे. कोट्यवधी मतपत्रिका छापणे, त्यांचे वितरण, सुरक्षित साठवणूक, मतमोजणी आणि निकाल प्रक्रिया यासाठी प्रचंड मनुष्यबळ व खर्च लागेल. त्यामुळे मतपत्रिकेच्या बाजूने बोलणाऱ्यांनी या व्यावहारिक बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे. दुसरीकडे ईव्हीएम समर्थकांनीही जनतेच्या प्रश्नांना अहंकारी पद्धतीने नाकारण्याऐवजी त्यांची उत्तरे देण्याची तयारी दाखवली पाहिजे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. निवडणूक आयोग, तंत्रज्ञ आणि राजकीय पक्ष यांनी एकत्र येऊन अधिक विश्वासार्ह आणि सर्वमान्य प्रणाली निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आज गरज आहे ती ईव्हीएम विरुद्ध मतपत्रिका या संघर्षाची नाही, तर निष्पक्ष आणि सर्वमान्य निवडणूक प्रक्रियेची. कोणतीही प्रणाली अंतिम सत्य नसते. काळानुसार सुधारणा कराव्या लागतात. जर जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी मतपत्रिका, व्हीव्हीपॅट किंवा अन्य कोणती तांत्रिक सुधारणा आवश्यक असेल, तर त्यावर खुली चर्चा होणे आवश्यक आहे.

लोकशाही केवळ मतदानाने जिवंत राहत नाही तर ती विश्वासाने जिवंत राहते. मतदाराला आपल्या मताचा सन्मान होत असल्याची खात्री वाटली पाहिजे. निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने लागतो हा दुय्यम मुद्दा आहे, परंतु निकाल कसा लागला याबद्दल सर्वांना समाधान असणे हा प्राथमिक मुद्दा आहे. २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात मतपत्रिकेवर मतदान व्हावे की ईव्हीएमवर, याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग आणि कायदे करणाऱ्या संस्थांना घ्यायचा आहे. मात्र या चर्चेने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, भारतीय मतदार आता अधिक सजग झाला आहे. तो फक्त मतदान करत नाही, तर मतदान प्रक्रियेबाबतही प्रश्न विचारत आहे. आणि प्रश्न विचारणारा नागरिक हीच सशक्त लोकशाहीची खरी ओळख आहे.

**-प्रवीण बागडे, नागपूर**

# उतरती

माणसाला माणूस म्हणून जगताना किती ताठा, रग, गुर्मी, अहंकार असतो. माणूस जीवन जगतो म्हणजे काय? जगण्यासाठी जीवन जगतो की जीवनासाठी जगतो? जन्म व मरण यातला प्रवास म्हणजे 'जीवन'! काळाबरोबर क्रमण करणं, काळाच्या रेषेत चालणं म्हणजे 'जीवन'!जन्मापासून काळाबरोबरचा प्रवास सुरू होतो. या प्रवासात काळाबरोबर माणूस अंगानं, मनानं, वयानं, बदलत जातो. त्याचा विकास होत जातो. काळाबरोबर बदलत चालत राहणं म्हणजे जीवन. काही बदल स्वीकारत नाही ते ही जगतात. पण कुठल्याना कुठल्या अंगानं त्यांचा विकास थांबतो. जीवन जगतात पण प्रगती खुंटते. तर जे काळाबरोबर बदलतात, किंबहुना बदलणाऱ्या काळा बरहुकुम स्वत:ला अपडेट करतात वा काळाची पाऊले ओळखून काळावरच स्वार होतात ते अधिक प्रगत होतात. भौतीक, ऐहिक जीवन समृद्ध करतात.

काळाबरोबर जीवन जगताना माणसास आप्तगण, नातेवाईक, समाज त्याला सोबत करतात. तर कधी माणूसच या घटकाचा अविभाज्य भाग बनत त्यांचा उतराई होतो. समाज आला की मग जात, पंथ, संप्रदाय, धर्म आला. मग माणसास श्रेष्ठ - कनिष्ठच्या पट्ट्या चिकटतात. प्रगतीची गणना चलनात होऊ लागली की गरीब श्रीमंतीची कसोटी येते. मग मनातल्या सुप्त भावना जागृत होत उगम होतो रग, ताठा गुर्मी, प्रौढी, अहंमतेचा!

जीवनाची तुलना सकाळ, दुपार व रात्रीशी केली जाते. जीवनाची दुपार म्हणजे माणसाचा भरभराटीचा काळ! अंगात ताकद असते, रक्त उसळत असतं, कधी हातात पैसा खुळखुळत असतो, सत्ता असते. लाथ मारीन तिथं पाणी काढीन! वा हात लावेन त्याचं सोनं करीन हा भाव उत्कट स्तरावर असतो! या वयात संयमाची गरज असते. ज्यानं संयम दाखवत काळाबरोबर प्रगती करत राहिला तो अधिक प्रगत होतो तर काही संयम न दाखवता वाहवत जात लयास जातात. पण हा मनात अहंमता माजवणारा टप्पा. ज्यांची सकाळ होतेय वा काहीची संध्याकाळ झालीय त्या घटकांना सावरत आधार द्यावा लागतो. पण सळसळतं तारूण्य वेगळ्याच धुंदीत असतं. नंतर मात्र चढती दुपार झुकू लागते. माणूस काळाबरोबर नाही धावू शकत! वारंवार होणारे बदल त्याला झेपावत नाही! तर कधीकधी काळही कात टाकत अनपेक्षित बदल घडवून आणतो. किती ही अपडेट होण्याचा प्रयत्न केला तरी एखाद्या मॉडेलमध्ये तसलं सॉफ्टवेअर नसलं की ते मॉडेलच कुचकामी ठरतं अडगळीत जावं तसंच आपलं जीवन होतं. धावण्याची कास सुटते व जीवन ठप्प होते. पण जे काळाबरोबर वारंवार बदलत राहतात. त्याच्यात ताठा अधिक वाढत जातो. पण एक बाब कायम लक्षात ठेवावी. काळ प्रत्येकास संधी देतो वा कंबरडं ही मोडतो. कधी भकास जागेवर वस्ती उठवतो तर वस्ती असलेल्या जागी स्मशान निर्माण करतो. म्हणून आज जे उच्च शिखरावर आहेत त्यांनी आपण कायम त्याच ठिकाणी राहू या भ्रमात राहत ताठा, रग दाखवू नये! हे समजण्यासाठी कधीकधी सहज फेरफटका मारत निसर्गातील भग्नता नक्की अनुभवावी. आज जे अनुपम आहे ते केव्हा ना केव्हा भग्न होणारच! सौंदर्याची चरम सिमा गाठली की भग्नता आलीच. पण या भग्नतेतच उद्याची बेनझीर निर्मिती दडलेली असते. म्हणून येणारा काळात होणार्या दु:खाची तीव्रता कमी व्हावी वा निदान आपल्या आत्मप्रौढीला वेळीच सावध करण्यासाठी म्हणा पण ही भग्नता नजरेखालून घालावीच.

पापुद्रे निघू पाहणाऱ्या वा गिलावा सुटणाऱ्या भिंती खपली उलू पाहणाऱ्या जखमा, ठसठसणाऱ्या, भळभळणाऱ्या जखमा, पूर ओसरलेल्या नद्यांची कोरडी पात्रे, उठलेल्या, पांगलेल्या जत्रा, उलगलेल्या राया, माळ, मळे सहज फिरता फिरता नजरेखालून घालावीत. कुसे मोडलेली, पोखरलेली लाकडे आढ्यातून - वास्यातून फिरलेली घरे, कडे मोडत्या धाब्यावर उगवलेले कुसळ, कुठे तरी पडलेली जात्याची चाळे, भंगलेल्या तुटलेल्या मुर्त्या, काठ तुटलेली पाळे, फुटलेली गाडगी, मडकी तडकलेल्या काचा, पारा उडालेल्या काचा, सुरकुतलेले चेहरे, खिळखिळलेली हाडे, खिचपत पडलेले चेहरे, दुभंगलेली मने, निझूर डोळे, आस गळलेल्या नजरा पहाव्यात.खचून चिरा व चुना उघड्या पडलेल्या हवेल्या, काटवन उगवलेल्या गढ्या, भग्न वाडे, मांजरी, पाकोळ्या, कुत्र्यांचा वास असलेली बंद घरे, पडकी मंदिरे, वठलेलं झाड, कुजणारं खोड, शेवाळलेलं पाणी, नाकाला झोंबणारी दुर्गंधी, उदास गल्लीबोळ, शांतता व भीतीनं संपृक्त स्मशान, पडलेल्या अर्धवट जळालेल्या ताटल्या, कलश, गाद्या, मडक्याच्या ठिकऱ्याचा खच व खिचडी ठेवलेले विसावे, गोरी, ढासळलेल्या विहिरी, लिंबू गंडे दोरे काही बाही पडलेले तिठे, चौफुले, मरीआई - म्हसोबाचं दूर एकाकी देऊळ, मुजाचा पिंपळ, गिऱ्हा लागणारा नाला, नदी, साती आसराचा डोह, आटत साकोळणारा तलाव, वेताळाचा वाडा, भगताची मढी सारं सारं धुंडाळत पाहताना कधी काळी इथली नांदती समृद्धी, सौंदर्य, जीवन का भकास झालं याचा धांडोळा घेताना रग जिरल्याचं जाणवतं का ते पहावं.

मावळती आशा, घेरणारी निराशा, पोखरणारं एकाकीपण, मृत्यूचं भय, स्वप्नाचा चुराडा करत उडून गेलेला आपल्याच पिलांचा थवा, दुरावलेला गोतावळा, रक्त आटवत वाट पाहणारे दु:खी खोकणारे जीव, खायला उठलेलं घरं, जीवघेणी सन्नाट दुपार, निसटून गेलेल्या क्षणाची सय करून देत चोर पावलांनी येणारी भोरी कातर संध्या नी मग काळ्या कभिन्न अंधारात पुढचं अधांतरी भविष्याचे वेध घेताना पळ पळ युगासमान वाटणारी रात, किरकिरणाऱ्या रातकिड्याच्या सहवासात डोळे फाडून फाडून अंधारात आपल्या अस्तित्वाचा शोध घेताना गात्रे गर्भगळित होणं, धाप लागणं, नी मग डोळ्यात कुठेतरी डुलकी येत असल्याचं समाधान उगवण्या आधीच उगवणारी मलूल पहाट! अनुभवावं हे सारं पांघरलेल्या गुर्मीच्या जाणीवा फेकत. सजलेल्या नववधूसारखी घोंगट उतरवणारी सांज ही किती कातर व बोहरी असते! शृंगारानं सजलेली, भाव विभोर करत स्वर्ग सुख देणारी, मोहमयी मीलनात कवेत घेणारी पावसात सौंदर्य रसात निथळणारी, थंडीत कुडकुडणारी रात ही इतकी भयाण भेसूर असते? हे पहावं. तीच संध्या, तीच रात, तीच पहाट मग अशा का भासाव्यात? काळ! काळाचा महिमा! असा उतरता काळ प्रत्येकाच्या नशिबात नसेल ही! पण अनुभवण्याने फुकाचा माज, रग ,ताठा नक्कीच उतरतो व माणूस माणूस म्हणून जगू लागतो. देवासारखं जीवन जीवन जगण्याचा अट्टाहास मुळीच नको! देव कुणी पाहिला! पण माणूस होता आलं पाहिजे! ताठा नसलेला माणूस!

**- वासुदेव शिवदास पाटील, नंदुरबार**

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-३२ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या ७१ विद्यार्थ्यांची टाटा मोटर्स कंपनीत निवड

सांगोला : येथील रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन या विभागातील ७१ विद्यार्थ्यांची पुणे येथील टाटा मोटर्स कंपनीमध्ये निवड झाली.

मेकॅनिकल विभागातील सागर चोरमले, हर्षद माने, पांडुरंग व्हनमाने, सिद्धार्थ व्हनमाने, प्रसाद बाबर, साहिल गायकवाड, साहिल कांबळे, शुभम चौगुले, सुखदेव सोपे, अजय घोडके, दत्ता शिंदे, इमरान आतार, अक्षय यादव, विजय शितोळे, ओंकार पवार, तुषार काशीद, विकास सरगर, स्वप्नील जाधव, हर्षद गायकवाड, पृथ्वीराज माने, संतोष सावंत, विवेक शिंदे, आदिनाथ पाटोळे, विवेक कलढोणे, विकास शास्त्री, अजय सातपुते, रोहित शिंदे, सागर इंगवले, दादासो भोसले, समर्थ घुले, गिरीश खंदारे, अभिषेक सांगोलकर, गणेश बुरुंगे व सानिका गरंडे या विद्यार्थ्यांची निवड झाली. तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभागातील श्रीकृष्ण कारंडे, विजय गायकवाड, संग्राम घोरपडे, धीरज पवार, गौरी माने, सायली मोरे, प्रज्ञा शितोळे, स्वप्नाली शिंदे, अपूर्वा झांबरे, निकिता येलपले, संचिता अवताडे, वैष्णवी कांबळे, साक्षी नलवडे, ऋतुजा चव्हाण, वैष्णवी गायकवाड, राधिका गायकवाड, सानिका साळुंखे, श्रद्धा भाकरे, रसिका चोरमुले, अंकिता बुडबुडे, अंजली चव्हाण, आरती वायदंडे, सानिका पवार, गौरी काटे, संजना गायकवाड, सोमनाथ शिंदे, विराज अवताडे, सौरभ खटकाळे, सौरभ दांइगडे, अभिजीत कोळसे-पाटील, आदर्श सरवदे, प्रसन्न वायदंडे, ओम ढोले, शुभम टिंगरे, दिग्विजय काटकर, गणेश चव्हाण व सागर शिंदे या विद्यार्थ्यांची निवड झाली.

संस्थेचे अध्यक्ष श्री.बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष इंजि.महादेव गायकवाड, सचिव श्री.अंकुश गायकवाड व सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.संदीप बावचे, सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांना मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभागातील टीपीओ समन्वयक प्रा.धनराज खंदारे, प्रा. ऋषिकेश गयाळी यांचे मार्गदर्शन लाभले.

# सांगोला नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम: ९ ते ११ जून दरम्यान महिला बचत गटांचे उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन नागरिकांना भेट देण्याचे नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने यांचे आवाहन



सांगोला : महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि महिलांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सांगोला नगरपरिषदेच्या वतीने एक विशेष पाऊल उचलण्यात आले आहे. सांगोला नगरपरिषदेच्या माध्यमातून दिनांक ९ जून ते ११ जून या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महिला बचत गटांच्या स्टॉलचे (प्रदर्शनाचे) आयोजन करण्यात आले आहे. सांगोला शहरातील व परिसरातील सर्व नागरिकांनी या स्टॉलला जास्तीत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी हे प्रदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती सौ. छायाताई मेटकरी यांनी या उपक्रमाविषयी बोलताना सांगितले की, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी आणि त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळून रोजगार उपलब्ध व्हावा, याच मुख्य उद्देशाने नगरपरिषदेमार्फत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या स्टॉलचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे महिलांच्या कलागुणांना आणि उद्योजकतेला नक्कीच बळ मिळेल. सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी नगरपरिषदेच्या पुढील धोरणाविषयी स्पष्ट करताना सांगितले की, महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करणे हे नगरपरिषदेचे उद्दिष्ट आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने सुरू झालेला हा प्रवास इथेच थांबणार नसून, यापुढेही महिलांच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जातील.

९ ते ११ जून दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे चालणाऱ्या या प्रदर्शनात महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध घरगुती, हस्तकला आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. तरी सांगोला शहर व परिसरातील नागरिकांनी, माता-भगिनींनी या प्रदर्शनाला अवश्य भेट देऊन महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे, जास्त संख्येने भेट द्यावी, असे आवाहन सांगोला नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने यांनी केले आहे.

# ८१ गावांची जीवनदायिनी शिरभावी योजना आर्थिक अडचणीत; आ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याने ५ कोटी ४१ लाखांच्या वीज बिलाचा प्रश्न मार्गी

## १.६३ कोटींची ग्रामपंचायती व संस्थांकडील थकबाकी; २० गावांना पुन्हा नियमित पाणीपुरवठा सुरू

सांगोला : सांगोला तालुक्यातील ८२ गावांना वर्षभर अखंडित पाणीपुरवठा करणारी आणि तालुक्याची 'जीवनदायिनी' म्हणून ओळखली जाणारी शिरभावी पाणीपुरवठा योजना सध्या आर्थिक संकटात सापडली आहे. विविध ग्रामपंचायती, गावांमधील थकबाकीदार ग्राहक व संस्थांकडील तब्बल १ कोटी ६३ लाख ६३ हजार ८१५ रुपयांची थकबाकी असल्याने योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व नियमित खर्चावर मोठा ताण निर्माण झाला आहे. मात्र, योजनेची तब्बल ५ कोटी ४१ लाख रुपयांची विजेची थकबाकी शासनाकडून भरून घेण्यात आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांना यश आल्याने पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत सुरू झाला आहे.

ऐन उन्हाळ्यातही वेळेवर पाणीपुरवठा होणारा तालुका अशी सांगोल्याची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. या ओळखीमागे शिरभावी पाणीपुरवठा योजनेचे मोठे योगदान आहे. शिरभावीसह तालुक्यातील ८१ गावांना वर्षभर पाणीपुरवठा करणारी ही योजना राज्यातील आदर्श योजनांपैकी एक मानली जाते. मात्र, गावागावांमधील वाढत्या थकबाकीमुळे योजनेच्या आर्थिक व्यवस्थापनास मोठा फटका बसत आहे. विविध गावांकडून १ कोटी ४९ लाख ६३ हजार ५०६ रुपये, तर विविध संस्थांकडून १४ लाख ३२० रुपये इतकी थकबाकी आहे. त्यामुळे एकूण थकबाकी १ कोटी ६३ लाख ६३ हजार ८१५ रुपये इतकी झाली आहे. या वाढत्या थकबाकीमुळे पाणीपुरवठा योजनेच्या दैनंदिन खर्चासह दुरुस्ती व देखभाल कामांमध्ये अडथळे निर्माण होऊ लागले होते.

दरम्यान, योजनेची ५ कोटी ४१ लाख रुपयांची विजेची थकबाकी मोठे संकट ठरत होती. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्रीस्तरावर पाठपुरावा करून शासनाकडून ही रक्कम मंजूर करून घेतल्याने वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका टळला. शासनाने थकबाकी भरल्यानंतर पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरळीत सुरू झाली असून तालुक्यातील अनेक गावांना मोठा दिलासा मिळाला आहे. सध्या पाणीपुरवठ्याची मागणी केलेल्या २२ गावांपैकी २० गावांना सुरळीत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून उर्वरित गावांमध्येही चाचणी व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नव्याने टाकण्यात आलेल्या पाईपलाईनची चाचणी पूर्ण झाल्यानंतर मागणीनुसार प्रत्येक तीन ते चार दिवसांनी पाणीपुरवठा केला जाणार आहे. पाणीपुरवठा मागणी करणाऱ्या गावांची नावे मंगेवाडी, गायगव्हाण, आलेगाव, आगलावेवाडी, गोडसेवाडी, देवळे, राजापूर, शिवणे, वाकी (शि), अचकदाणी, सोनलवाडी, संगेवाडी, डोंगरगाव, मानेगाव, तरंगेवाडी, मेडशिंगी, बुरलेवाडी, वाकी (घे), वझरे, घेरडी, मेथवडे (माळीवस्ती) व एखतपूर या गावांनी पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे. यापैकी तरंगेवाडी व वझरे येथे लवकरच पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

शिरभावी पाणीपुरवठा योजनेच्या नूतनीकरणाला वेग- शिरभावी पाणीपुरवठा योजनेच्या नूतनीकरणाची कामे २७ जुलै २०२४ पासून सुरू असून यासाठी शासनाकडून सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. योजनेअंतर्गत ६०० किलोमीटर लांबीच्या पाईपलाईनपैकी सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी सध्या विविध भागांत चाचण्या सुरू आहेत. योजनेची कामे अंतिम टप्प्यात पोहोचल्याने लवकरच अधिक प्रभावी पाणीपुरवठा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आमदार देशमुख यांच्या प्रयत्नातून विजेची साडेपाच कोटींची थकबाकी भरली ग्रामपंचायती व विविध संस्थांकडील थकबाकीमुळे योजना अडचणीत सापडली असतानाच विजेची तब्बल ५ कोटी ४१ लाख रुपयांची थकबाकीही मोठा प्रश्न बनली होती. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करून ही रक्कम शासनाकडून भरून घेतली. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका टळून योजना पुन्हा कार्यान्वित झाली असून सध्या मागणी असलेल्या गावांना नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

शिरभावी पाणीपुरवठा योजनेची ५ कोटी ४१ लाख रुपयांची विजेची थकबाकी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नातून शासनाने भरल्यामुळे वीजपुरवठा सुरळीत झाला आहे. सध्या मागणी केलेल्या २२ गावांपैकी २० गावांना पाणीपुरवठा सुरू आहे. उर्वरित गावांनाही तीन ते चार दिवसांत नियमित पाणीपुरवठा केला जाईल. मात्र, थकबाकीदार गावांनी त्वरित थकबाकी भरून सहकार्य करावे .

<u>-संजयकुमार स्वामी,</u>
उपअभियंता, शिरभावी पाणीपुरवठा योजना.

# महूदची कावड केदारनाथच्या दारी

## पावणे दोनशे किलोची कावड खांद्यावर; शिवभक्तांची केदारनाथपर्यंत थरारक पदयात्रा

सांगोला : बर्फाच्छादित डोंगर, सतत बदलणारे हवामान अन् २२ किलोमीटरचा अत्यंत दुर्गम मार्ग अशी कठीण परिस्थिती असतानाही खांद्यावर सुमारे पावणे दोनशे किलो वजनाची कावड घेऊन पायी चालत जाऊन महूद(ता.सांगोला) येथील शिवभक्तांनी उत्तराखंड मधील केदारनाथाचे नुकतेच दर्शन घेतले.भगवान शंकरावरील अतूट श्रद्धा,मनात अथांग धैर्य आणि मानसिक बळ ठेवून कावडी सह कठीण परिस्थितीवर मात करत अन् बदलत्या हवामानाशी झुंज देत केदारनाथाचे दर्शन घेणाऱ्या महूद येथील युवकांचे कौतुक होत आहे.

सांगोला तालुक्यातील महूद येथे भगवान शंकराच्या कावडी आहेत. येथील मानाच्या कावडीला क्षेत्र शिंगणापूर, तामजाई देवी यात्रा,कटफळ येथील पंचमुखी महादेव मंदिर यात्रा अशा विविध ठिकाणी मान आहे. विविध ठिकाणच्या यात्रा मध्ये जाऊन तेथील मंदिरातील भगवंताला कावडीच्या साह्याने जलाभिषेक केला जातो.पारंपारिक पद्धतीने ही कावड हलग्यांच्या कडकडाटात नाचवली जाते.

सुमारे एक महिनाभर महूद परिसरात अनेक ठिकाणी या कावडीचा भंडारा घातला जातो.अशा भंडाऱ्याचा लाभ हजारो भाविक घेतात.हलग्यांच्या निनादामध्ये खांद्यावर कावड घेऊन ती विशिष्ट पद्धतीने नाचविण्याचे कसब येथील तरुणांकडे आहे.असंख्य तरुण या कावडी मंडळात गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहेत.काही तरुणांची दुसरी,तिसरी पिढी या कावडी मंडळात राबत आहे. दरवर्षी शिंगणापूर सह इतर यात्रांमध्ये या कावडी सहभागी होतात. या कावडी मंडळातील तरुण कार्यकर्ते बाबुराव नागणे यांच्या मनात ही कावड घेऊन केदारनाथ येथील दर्शनाला जावे असे आले.

यापूर्वी पुणे जिल्ह्यातील काही कावडी केदारनाथ येथे दर्शनाला गेल्या होत्या.त्यानुसार आपणही कावड घेऊन केदारनाथला जावे असे त्यांना वाटले. त्यांनी आपल्या मनातील विचार शिंगणापूर यात्रेत जमलेल्या तरुणांसमोर मांडला. महूद येथील ही कावड सुमारे पावणे दोनशे किलो वजनाची आहे. या कावडीचे हंडे खूप मोठे आहेत.अशी ही कावड कावडी मंडळातील शिवभक्तांनी स्वतः खांद्यावर घेऊन जाण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.

त्यानुसार नावे नोंदविण्यास सुरुवात करण्यात आली.यामध्ये १६ वर्षांचा पार्थ काकडे ते ७० वर्षाचे नाना मेटकरी असे सुमारे ६३ शिवभक्त यामध्ये सहभागी झाले. त्यासाठी सर्व इच्छुक कावड भक्तांकडून ठराविक रक्कम जमा करून घेण्यात आली. एक आयशर टेम्पो, एक पिकअप आणि एक चार चाकी वाहन या तीन वाहनातून कावड,६३ तरुण भक्त,प्रवासात लागणारे जेवणाचे साहित्य घेऊन हे सर्वजण १५ मे रोजी केदारनाथला रवाना झाले.



धुळे,इंदोर, दिल्ली,हरिद्वार असा प्रवास करत ते हर की पौडी (उत्तराखंड) येथे दाखल झाले. येथील गंगामाता मंदिरास कावडीने जलाभिषेक केला.व कावड पुढे गौरीकुंड येथे पोहोचली.

सुमारे पावणे दोनशे किलो वजनाची कावड खांद्यावर घेऊन बाबुराव नागणे, प्रतीक ताटे,बापू महाजन, विजय नागणे, रुद्र लोखंडे, राहुल गायकवाड, सचिन भोसले, मनोज नागणे, सुभाष नागणे, मयूर तुपे, विनायक देशमुख, वैभव भोसले, शिवप्रसाद बाजारे, महेंद्र बाजारे, अभिषेक महाजन, नवनाथ माने, सनी भोसले, पार्थ काकडे, दिगंबर येडगे, विठ्ठल गिरी महाराज, मोहन येडगे, दीपक नागणे, विजय आण्णा नागणे, गणेश विभुते, गणेश बिडवे, अमर शीलवंत, नाना मेटकरी या शिवभक्तांनी २१ मे रोजी सकाळी सात वाजता चालण्यास सुरुवात केली. अंधार पडल्यानंतर काही काळ विश्रांती घेतली.व २२ मे रोजी सकाळी ७ सात वाजता ते केदारनाथ मंदिरासमोर पोहोचले.

# भावपूर्ण श्रद्धांजली !!!

## सोळावे पुण्यस्मरण

देव घरातल्या दिव्या,रात नाही रे सरली,वात फुलायच्या आधी,
कशी विझुनिया घेली,जाण्या पैलतिरी आधी,कशी नाव उलटली,
मैदानाच्या सवंगडया,खेळी अपुरी राहिली दुःख अंतरी मावेना,
अश्रु दाटले नयनी...!!!



## कै. मारुती शिवाजी सोनवणे

(मृत्यू दिनांक ४ जून २०१०)

### शोकाकुल

श्रीमती लता मारूती सोनवणे
श्रीमती शोभा राजाराम कटके

श्रीमती नलिनी विठ्ठल पोळ
ॲड.श्री.रोहित मारूती सोनवणे
श्री.शैलेंद्र सुर्यकांत पोळ
श्री.बाबासाहेब पांडूरंग चौधरी
श्री.विश्वजित भागवत सोनवणे
कु.अमरजित भागवत सोनवणे
चि. मयुर,चि.क्षितीज,शौर्य



श्रीमती निर्मला भागवत सोनवणे
सौ.शितल रोहित सोनवणे
सौ.संध्याराणी शैलेद्र पोळ
सौ.श्रध्दा बाबासाहेब चौधरी
सौ.साधना विश्वजित सोनवणे
कु.पूजा मारूती सोनवणे
चि.मंथन,नवलाई,क्रिश,शंतनू

**सोनवणे, खंदारे, कटके, पोळ, बोराडे, शिंदे, चौधरी परिवार**